पोलीसांनी बजावलेल्या सेवेकरिता बक्षीसासाठी रक्कम मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः पोलीस-१५१७/प्र.क्र.२९९/पोल-५अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई
दिनांक : ७ मार्च, २०१८

वाचा :-

१) **शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पोलीस-१५१७/प्र.क्र.२९९/पोल-५अ, दि.१४/९/२०१७**
२) **पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/३१/३८/ पोलीसांची विशेष सेवा/१२६/२०१७, दि.१२/१०/२०१७**
३) **पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे पत्र क्र,२८/पोआ/कक्ष-१४/अर्थसं/१८, दि.७/२/२०१८**

प्रस्तावना :-

राज्यातील दि.२५ ऑगस्ट ते दि.५ सप्टेंबर २०१७ या कालावधीत मोठया प्रमाणावर गणेश उत्सव तसेच बकरी ईद हे सण साजरे करण्यात आले होते. या सणांच्या कालावधीमध्ये पोलीसांनी अतिशय चांगल्या रितीने सामाजिक एकोप्यास कोणतीही बाधा येवू न देता चोख कामगिरी बजावली आहे.

मुंबई व परिसरातील काही भागात ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टीमुळे पुरपरिस्थिती निर्माण झाली होती तसेच जनजीवन विस्कळीत झाले होते. सदरहू परिस्थितीला मुंबई पोलीस व इतर पोलीस घटकांनी चांगल्या प्रकारची कामगिरी बजावून मालमत्ता व जिवित हानी होवू न देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. अशारितीने महाराष्ट्र पोलीसांनी सक्षमरित्या व नियोजनबध्द पध्दतीने कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आपले काम केलेले आहे.

वरील कामगिरीची नोंद घेऊन राज्याच्या पोलीस दलातील पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या संवर्गातील कर्मचाऱ्यांना बक्षिस स्वरुपात रु.५ (पाच) कोटी इतका निधी वितरीत करण्यास व सदरचा निधी “२०५५-पोलीस, (०२) जिल्हा पोलीस” या लेखाशिर्षाअंतर्गत खर्ची टाकण्यास संदर्भाधिन दि.१४/९/२०१७ च्या शासन निर्णयान्वये शासनाची मंजूरी देण्यात आली आहे. तथापि, महाराष्ट्र पोलीस आणि मुंबई पोलीसांकरीता अर्थसंकल्पीय निधी वितरणासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष असल्याने मुंबई पोलीसांकरीता वितरीत करावयाच्या बक्षिसाच्या रक्कमेचा निधी बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयासाठी असणाऱ्या लेखाशिर्षाअंतर्गत वितरीत करण्यास मंजूरी देण्याची आवश्यकता आहे.

शासन निर्णय :-

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या संवर्गातील कर्मचारी यांनी गेल्या काही महिन्यांच्या कालावधीत केलेल्या कामगिरीची नोंद विशेषत्वाने घेऊन त्यांना बक्षीस स्वरुपात रु.२ (दोन) कोटी इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदरहू निधी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी संबंधित नियंत्रण प्रमुखांना वितरीत करावा आणि नियंत्रण प्रमुखांनी सदरहू रक्कम संबंधित पोलीस कर्मचारी यांना अदा करावी.

३. उपरोक्त प्रयोजनासाठी येणारा खर्च मुख्य लेखाशिर्ष "२०५५-पोलीस, (०२) शहर पोलीस, (०२) (०१) शहर पोलीस-आस्थापना, ०५, बक्षिसे (दत्तमत) (अनिवार्य), (२०५५००९७) या उदिष्टाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०७१५२९१०७०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

V. M. Bhat

Digitally signed by V. M. Bhat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5f0272b97156a5d2812bad6725ca46fb2671d1da08208cfdd6677fac0afd6bf2, cn=V. M. Bhat
Date: 2018.03.07 15:31:05 +05'30'

(व्यं.मा.भट)
उप सचिव, गृह विभाग

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
३. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई
५. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
७. निवडनस्ती (पोल-५अ)